पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- १५/११/२०१९*

## जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस ७ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा तसेच १,०००/- रु. दंड

=> जिल्हा प्रमुख सत्र न्यायाधीश, गडचिरोली श्री. स्वप्नील खटी यांच्या न्यायनिर्णय

दिनांक २६/०८/२०१६ रोजी फिर्यादी पारितोश वसंत मंडल, वय ४८ वर्षे रा. रविंद्रनगर ता. सिरपुर जि. आदिलाबाद (राज्य तेलंगाणा) यांनी फिर्याद दिली की, त्यांची मुलगी मयत अंजना दुखीराम बिश्वास, रा. आनंदग्राम हिला आरोपी दुखीराम सुभाष बिश्वास (मयताचा पती) रा. आनंदग्राम ता. चामोर्शी जि. गडचिरोली यांनी फिर्यादीचे मुलीला लहान सहान कारणावरुन त्रास देवून फिर्यादीचे मुलीचे लग्नात आरोपी दुखीराम बिश्वास याने फिर्यादीस दिलेले २०,०००/- रु. घेवुन ये म्हणुन त्रास देवुन मयत अंजना हिला जिवे मारण्याच्या उद्देशाने फिर्यादिच्या मुलीचे अंगावर रॉकेल टाकुन जाळुन मारले अशी तोंडी फिर्याद दिली.

फिर्यादिने पोलीस स्टेशन आष्टी येथे दिनांक २६/०८/२०१६ रोजी तोंडी रिपोर्ट दिल्यावरुन पोलीस स्टेशन अप.क्र. २८/२०१६ कलम ३०२,३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला व तपास करण्यात आला.

सदरचा तपास तपासी अधिकारी श्री. संदिप तिरमदास कापडे पोस्टे आष्टी यांनी तपास पुर्ण करुन आरोपी विरोधात सबळ पुरावा मिळाल्याणे दोषारोपपत्र तयार करुन मा. न्यायालयात दाखल केले.

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश स्वप्नील खटी यांनी साक्ष पुरावा तसेच वैद्यकिय अधिकारी यांचे अहवालावरुन व सहा. जिल्हा सरकारी वकील श्री. सचिन यु. कुंभारे यांच्या युक्तिवाद ग्राह्य धरुन दिनांक १४/११/२०१९ रोजी आरोपी नामे दुखीराम सुभाष बिश्वास, मयताचा पती याला दोषी ठरवुन भा.द.वि. चे कलम ३०४ (ब) मध्ये ७ वर्षे सक्षम कारावासाची शिक्षा व १,०००/- रु. दंडाची शिक्षा देण्यात आली.

मा. कोर्टात कोर्ट पैरवी अधिकारी श्री. प्रकाश तुंकलवार पोलीस निरीक्षक, गडचिरोली यांनी पैरवी अधिकारी म्हणुन काम पाहिले.